स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय,
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.
www.dhepune.gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९
Email: mavi.dhepune@gov.in

क्र.एनजीसी/२०२३/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/ 3966 दि.०२.०३.२०२३

2 MAR 2023

**अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित.**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य.

**विषय -अशासकीय महाविद्यालयांच्या नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन व मानांकनाबाबत.**

**संदर्भ -** १. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१०/(२०/१०)/विशि-३ दि.०८.१०.२०१०.
२. संचालनालयाचे क्र.एनजीसी/२०२२/नॅक/औवि/मवि-३/१०१०० दि.२७.०७.२०२२, १२२०४ दि.०३.१०.२०२२. व ६७८ दि.२५.०१.२०२३.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ मधील शासन निर्णयानुसार अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांचे मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन अनिवार्य करण्यात आलेले आहे. यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये अपेक्षित वाढ होऊन उच्च शिक्षणाचा दर्जा वाढण्यास मदत होते.

उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेचे जतन व संवर्धन व्हावे याकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाने नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करणेबाबत निर्देशित केले आहे. या अनुषंगाने संचालनालयाने वेळोवेळी विभागातील शासकीय/अशासकीय महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेणेबाबत निर्देशित केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मधील पोटकलम ६(ख) मध्ये महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाची तरतूद नमूद केली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथील याचिका क्र.५२८०/२०१५ मधील दि.१६.११.२०१६ च्या निकालातही नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाचे महत्व अधोरेखित केले आहे.

राज्याची प्रगती होण्यासाठी व जागतिकीकरणाच्या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी दर्जेदार उच्च शिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी उच्च व तंत्र शिक्षणाचा दर्जा उंचावणे व त्याची गुणवत्ता वाढविणे आवश्यक आहे. याकरिता महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाचे महत्व व अनिवार्यता वेळोवेळी अधोरेखित केली आहे. तथापि, बहुतांश पात्र महाविद्यालयांनी अद्यापपावेतो नॅक मूल्यांकन केले नसणे व पुनर्मूल्यांकन वैधता कालावधी समाप्त झाला असल्याचे नॅकच्या संकेतस्थळावरुन निदर्शनास आले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधामध्ये वाढ होणे व शैक्षणिक गुणात्मक दर्जा वाढीसाठी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेणे आवश्यक आहे.

उपरोक्तप्रमाणे वेळोवेळी निर्देश देवूनही महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेतलेले नाही ही बाब शैक्षणिकदृष्ट्या योग्य नाही. यास्तव सर्व महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रक्रिया तात्काळ सुरु करुन दि.३१ मार्च, २०२३ पर्यंत नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रारंभ टप्यातील संस्था नोंदणी (HEI Registration) करुन IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. या दिनांकापर्यंत IIQA सादर न केल्यास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता प्रथम वर्षाच्या प्रवेशास निर्बंध लागू करणेबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल.

सबब, उपरोक्त नमुद विषयी विभागनिहाय ५८४ व ११९ महाविद्यालयांची सोबत जोडलेल्या यादीनुसार आपल्या विभागातील संबंधित महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन व मानांकनाबाबतची सद्यास्थिती खालील तक्त्यात तात्काळ संचालनालयास mavi.dhepune@gov.in या ई-मेलवर माहिती देण्यात यावी.

**तक्ता**

| विभाग | महाविद्यालयाचे नाव | नॅक मूल्यांकन प्रक्रियेत सहभाग घेतला आहे/नाही. नसल्यास संक्षिप्त कारण नमूद करावे. | असल्यास प्रक्रियेची सद्यस्थिती जसे (LOI / IIQA Submission/ SSR submission / Peer Team Visit etc.) | मूल्यांकन झाले असल्यास<br>नॅक ग्रेड व CGPA | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

सोबतः - NAAC Inactive महाविद्यालयांची यादी. (दि.२८ फेब्रु.२०२३ अखेर)
(अशासकीय अनु. महावि.५८४, अशासकीय विना अनु./कायम विना अनु. महावि.-११९)

प्रस्तुतची बाब विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायमविना अनुदानित महाविद्यालये/संस्था यांचे अध्यक्ष व प्राचार्य यांना व्यक्तिशः अवगत करावी. तसेच केलेली कार्यवाही संचालनालयास अवगत करावी.

(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**प्रत- कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना माहिती व कार्यवाहीसाठी**

२/- त्यांना कळविण्यात येते की, विषयांकित प्रकरणी आपल्या स्तरावरुन आवश्यक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.१० मार्च,२०२३ पर्यंत संचालनालयास सादर करावा.

**प्रत- माहितीस्तव सादर**

१.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
२.स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२